कोर्ट कॉपी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): नागपुर शहर   P.S.(ठाणे): मनकपुर   Year (वर्ष): 2019
   FIR No.(प्रथम खबर क्र.): 0140   Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 17/05/2019 01:15 बजे
2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)   Sections (कलम)
   1   भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८   7
3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
   1. Day(दिवस): गुरुवार   Date From (दिनांक पासून): 16/05/2019
   Date To ( दिनांक पर्यंत): 16/05/2019
   Time Period (कालावधी): पहर 5   Time From (वेळेपासून): 13:30 बजे
   Time To (वेळेपर्यंत): 15:47 बजे

   (b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   Date (दिनांक ): 17/05/2019   Time (वेळ): 00:10 बजे
   (c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ
   Entry No. (नोंद 002   Date & Time (दिनांक आणि वेळ): 17/05/2019 00:39 बजे
4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी
5. Place of Occurrence (घटनास्थळ):
   1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 3 किमी   Beat No. (बिट क्र.):
   (b) Address (पत्ता): विभागीय क्रिडा संकूल ,कार्यालय,मानकापूर,नागपूर ,मानकापूर,नागपूर
   (c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):
   District(State) (जिल्हा(राज्य)):
6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) Name (नाव): अर्चना सुरेश गजभिये
   (b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)
   (c) Date/Year of Birth (जन्म 1989   (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
   (f) Passport No.(पारपत्र क्र.):   Date of Issue (अदा केल्याची तारीख):
   Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):
   (g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) Address (पत्ता):

तक्रार

अँन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दि. १३/०५/२०१९

प्रति,

मा. पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, नागपूर.

विषयः— लाचरक्कम मागत असल्याबाबत तक्रार.

मी अर्चना सुरेश गजभिये वय ३० वर्ष व्यवसाय— ॲडव्होकेट, रा.वार्ड नं.१,परसोडी,ता. पारशिवनी जि.नागपूर,ह.मु.फ्लॅट नं.ए–०३, कृष्णार्जुन अपार्टमेंट, हनुमान मंदीर जवळ, न्यु मानकापुर, कोराडी रोड, नागपूर मो. ९४०५३२३९९६

मी समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय नागपूर येथे येवुन तक्रार देते की, मी नागपूर येथे वकीलीचा व्यवसाय करते तसेच महेंद्र बहुउद्देशिय शिक्षण संस्था, परसोडी, पारशिवनी या संस्थेमध्ये मी सचीव म्हणून काम करते. सदरची संस्था हि निमशासकीय आहे. सदरचे संस्थेची धर्मदाय आयुक्त कार्यालय नागपूर या कार्यालयात नोंदनी करण्यात आलेली आहे.

सन २०१८–२०१९ या वार्षीक वर्षात युवक कल्यान योजना प्रशिक्षण राबविण्याकरीता जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर यांचे कडे आमचे संस्थेव्दारे प्रस्ताव मंजूरी करीता सादर करण्यात आला होता.त्यानंतर जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर या कार्यालयाव्दारे सदरचा प्रस्ताव मंजूर होवून दि. २९/०४/२०१९ रोजी संस्थेचे बँक खात्यामध्ये अनूदानाची रक्कम रू २५०००/— हि जमा करण्यात आली होती. परंतू सदरची रक्कम मंजूर झालेनंतर ती मंजूर झालेले आदेशाची प्रत आम्हाला संस्थेचे ऑडीट करीता आवश्यक असते म्हणून सदरहु आदेशाची प्रत घेण्याकरीता मी दि.०४/०५/२०१९ रोजी जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर या कार्यालयात गेली असता तेथील क्रिडा अधीकारी श्रीमती बांते मॅडम यांना मी भेटली. त्यावेळेस त्यांनी मला मी तुमचे संस्थेव्दारे प्राप्त प्रस्ताव मंजूर केला आहे व सदरची रक्कम देखील तुमचे संस्थेचे खात्यात जमा झाली आहे म्हणून तुम्ही मला ५०००/—रू दया व नंतरच मंजूरी आदेशाची प्रत घेवून जा असे म्हणाल्या त्यावर मी त्यांना ठिक आहे मी तुम्हाला सांगते काय ते आणी ८ १० दिवसा नंतर येते असे म्हणाली. अश्या प्रकारे जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर येथील क्रिडा अधीकारी श्रीमती बांते मॅडम यांनी मला संस्थेव्दारे प्राप्त प्रस्ताव मंजूर केला व रक्कम संस्थेचे खात्यात जमा केली म्हणून ५,०००/—रू लाचेची मागणी केलेली आहे.

तरी मला संस्थेव्दारे प्राप्त प्रस्ताव मंजूर केला व रक्कम संस्थेचे खात्यात जमा केली म्हणून जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर येथील क्रिडा अधीकारी श्रीमती बांते मॅडम यांना ५०००/—रू लाच रक्कम देण्याची माझी मुळीच इच्छा नाही. म्हणून मी क्रिडा अधीकारी श्रीमती बांते मॅडम हिचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करीता तक्रार देत आहे. माझे जिल्हा क्रिडा अधिकारी,नागपूर येथील क्रिडा अधीकारी श्रीमती बांते मॅडम यांचेशी पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किवा वैमनस्य नाही. मी क्रिडा अधीकारी श्रीमती बांते मॅडम यांना लाचेमध्ये देण्याकरीता ५०००/—रू सोबत आणले आहे."

स्वा/—
( अर्चना सुरेश गजभिये)

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | वार्ड नं1,परसोडी,तापारिशवनी जि ,हमुफलट नंऐ-03,कष्णअर्जुनअपार,नुमान मंदीर जवळ,न्यु मानकापुर,मनकपुर ,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | वार्ड नं1,परसोडी,तापारिशवनी जि ,हमुफलट नंऐ-03,कष्णअर्जुनअपार,नुमान मंदीर जवळ,न्यु मानकापुर,मनकपुर ,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती त्रिवेणी नत्थूजी बांते | | | 1. भवाणी टावर्स,फ्लट , क्रमांक 204, जोगेवर,नर्सिंग होम जवळ भंडारा, मनकपुर ,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):

1) पोलीस स्टेशन-मानकापूर, नागपूर शहर2) अपराध क्रमांक व कलम- 140 /2019 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 (संषोधन) सन 2018 3) अपराध घडल्याची ता. व वेळ- दिनांक 16/05/2019 चे 13.30 वाजतापासुन 15.47 वाजता पर्यंत. 4) पो. स्टे. ला माहीती ता. व वेळ दिनांक 1 7/05/19 चे 00.10 वा 5) अपराध घडल्याची जागा- विभागीय क्रिडा संकूल कार्यालय,मानकापूर, नागपूर 6) गुन्हा दाखल ता. व वेळ - 17/05/2019 चे ........ वाजता. 7) तक्रारदाराचे नाव- अर्चना सुरेश गजभिये वय 30 वर्ष व्यवसाय- अॅडव्होकेट, रा.वार्ड नं. नागपूर,ह.मु.फलट नं.ऐ-03,कृष्णअर्जुन अपार्टमेंट,हनूमान मंदीर जवळ,न्यु मानकापु कोराडी रोड,नागपूर 8) आरोपी नाव, हुद्दा व पत्ताः- श्रीमती त्रिवेणी नत्थूजी बांते, वय 39 वर्ष पद- क्रिडा अधिकारी,विभागीय क्रिडा संकुल कार्यालय,मानकापूर नागपूर रा. भवाणी टावर्स,फ्लट क्रमांक 204,जोगेवर नर्सिंग होम जवळ भंडारा 9) तपासी अधिकारी :- राजेष पुरी, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर दाखल अधीकारी - पोउपनी वाय.आर साहारे पो.स्टे. मानकापुर नागपूर लोकसेवक श्रीमती त्रिवेणी नत्थूजी बांते, वय 39 वर्ष पद- क्रिडा अधिकारी,विभागीय क्रिडा संकुल कार्यालय,मानकापूर नागपूर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून आमचे संस्थेव्दारे प्राप्त प्रस्ताव मंजूर केला व रक्कम संस्थेचे खात्यात जमा केली याचा मोबदला म्हणून मला 5000/- रू लाच रक्कमेची मागणी करून लाचरक्कम स्विकारली. म्हणुन त्यांचेविरूध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (संषोधन) सन 2018 अन्वये गुन्हा दाखल

तक्रार नोंदवुन घेतल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख मला करून दिली. श्री राजेश पुरी यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर श्री राजेश पुरी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री राजेश पुरी यांचेकडे मी लाचरक्कम म्हणुन देण्याकरीता रू. ५००० (ज्यात रू. ५०० दराच्या १० चलनी नोटा) सादर केल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना अ‍ॅथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अ‍ॅथ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली.पुढील सापळा पडताळणी कार्यवाही दि.१६/०५/१९ रोजी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार श्री राजेश पुरी यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जुने सचीवालय,नागपूर येथे दि. १६/०५/१९ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर राहण्याबाबत सुचना दिल्या तसेच सापळा पार्टीतील सदस्य व दोन्ही पंचाना दि. १६/०५/१९ रोजीचे सकाळी १०.३० वाजता अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर कार्यालयात येण्याबाबत सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

मी दि. १६/०५/१९ रोजी सकाळी १२.०० वाजता अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जुने सचीवालय,नागपूर येथे पहोचले तेथे पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी, दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य हजर होते.त्यानंतर त्यांनी मला पंचनामा क्र १ मधील सुचना समजावून सांगीतल्या त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांचे सुचने वरून मानकापूर क्रिडा संकूलचे मागील प्राचिन शिव मंदीर येथे माझी अ‍ॅक्टीवा गाडी क्र एम.एच ४० बी.एस–६३८३ ने जावून थांबले माझे मागे मागे पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी, दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य असे शासकीय वाहन क्र. एम.एच–३१ डी. झेड–०४७६ ने पोहचले. त्यानंतर श्री राजेश पुरी यांनी मला शासकीय वाहनात बसण्यास सांगुन माझेजवळील सर्व साहित्य व चिजवस्तु शासकीय वाहनाच्या शिटवर काढुन ठेवण्यास सांगितले. त्यानुसार मी सर्व वस्तु काढुन ठेवल्या असता, त्यांनी त्याबाबत सविस्तर अंगझडती यादी तयार केली. व सर्व वस्तु मला परत दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांनी पंचासमक्ष मै.अ.महीला लोकसेवक यांची लाच रकमेची मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे वेळ १३.३१ वाजताचे सुमाराम व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांचे विभागीय क्रिडा संकुल कार्यलिय,मानकापूर,नागपूर या कार्यालयात गेली असता तेथे लोकसेवक श्रीमती बांते मॅडम ह्या मला भेटल्या तेथे श्रीमती बांते मॅडम यांनी मला संस्थेव्दारे प्राप्त प्रस्ताव मंजूर केला व रक्कम संस्थेचे खात्यात जमा केली म्हणून मला ५०००/– रू लाच रकमेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी वेळ सुमारे १४.०५ वा. पोलीस निरीक्षक, श्री राजेश पुरी व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. त्यांनतर पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री राजेश पुरी यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांनी मला संस्थेव्दारे प्राप्त प्रस्ताव मंजूर केला व रक्कम संस्थेचे खात्यात जमा केली म्हणून मला ५०००/– रू लाच रकमेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याबाबतची दोन्ही पंचासमक्ष खात्री केली. त्यांनतर लगेच पुढील सापळा कार्यवाही करण्याचे

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Vazeer Hussain Shaikh(I (Inspector)) / PNMAH46864 or

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे Rank (पद):

No.(क्र.): to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

ड्यूटी ऑफिसर
पो.स्टे. मलकापूर

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाम): Vazeer Hussain Shaikh
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PNMAH46864

पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांनी ठरविले. त्याप्रमाणे श्री राजेश पुरी यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगितल्या. तसेच लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी डोक्यावरील स्कॉर्फ काढुन स्कार्फने चेहरा पुसुन लाचरक्कम स्विकारल्याबाबतचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यान संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर ॲथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रू. ५०००/— (ज्यात रू. ५००/-- दराच्या १० चलनी नोटा) माझे जवळील जुटची क्रिम रंगाचे हॅन्डबॅग मधील पॉकेट मध्ये ठेवण्यात आली. त्यानंतर वेळ सुमारे १५.०६ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून जवळील जुटची क्रिम रंगाचे हॅन्डबॅग मध्ये ठेवण्यात आले. पंच क्र. १ यांचेसह माझे दुचाकी वाहनाने लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांचे विभागीय क्रिडा संकुल कार्यालय मानकापूर,नागपूर या कार्यालयात जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य मागे काही अंतर ठेवुन आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ असे विभागीय क्रिडा संकुल कार्यालय,मानकापूर,नागपूर या कार्यालयात गेलो. त्याठिकाणी लोकसेवक श्रीमती बांते मॅडम हे हजर होते. त्यानंतर लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांनी मला इश्याऱ्याने मागे येण्यास सांगीतले त्यावर मी त्यांचे मागे गेलो माझे मागे पंच क्र १ हया आल्या, तर त्यांनी आम्हाला एका अंधार असलेले रूम मध्ये घेवून गेले व तेथील एका खडर्यामध्ये (कागदी बॉक्समध्ये) लाचरक्कम ठेवण्यास हाताच्या बोटाच्या इशाऱ्याने सांगीतली.त्यावर मी तेथे कसे ठेवू मॅडम असे म्हणाली असता श्रीमती बांते मॅडम यांनी ठेवून द्या काही नाही होत तेथेच ठेवा असे म्हणाल्या त्यांवर मी ॲथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रु. ५०००/ (ज्यात रू. ५००/— दराच्या १० चलनी नोटा) जवळील जुटची क्रिम रंगाचे हॅन्डबॅग मधील पॉकेट मधुन काढून तेथील एका खडर्यामध्ये (कागदी बॉक्समध्ये) पंच क्र १ यांचे समक्ष ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास डोक्यावरील स्कार्फ काढुन स्कार्फने चेहरा पुसुन लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांनी लाचरक्कम स्विकारल्याबाबत नियोजीत इशारा केला.त्यानंतर काहीवेळातच श्रीमती बांते मॅडम हया कार्यालयाचे बाहेर येवून आपली स्कुटी गाडी काढून निघून जाण्याचे प्रयत्नात होत्या त्यावर मी हिच श्रीमती बांते मॅडम असलेचा इशारा पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांना दिला नंतर मी पंच क्रमांक १ यांचेसह कार्यालयापासुन काही अंतरावर त्याच परीसरात थांबले.त्यानंतर सापळा पथकातील महीला कर्मचारी यांनी श्रीमती बांते मॅडम यांना ताब्यात घेतले व मला पो.नि.राजेश पुरी यांनी बोलाविले. पंच क्र १ यांचे सह मी सापळा पथका जवळ आले त्यानंतर वेळ सुमारे १५.४७ वा. पंच क्रमांक १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला व हयाच श्रीमती बांते मॅडम असले बाबत मी पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांना कळविले.

..त्यानंतर गै.अ. लोकसेवक श्रीमती बांते मॅडम यांना पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांनी त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांचे नाव श्रीमती त्रिवेणी नत्थूजी बांते, वय ३९ वर्ष पद-- क्रिडा अधिकारी,विभागीय क्रिडा संकुल कार्यालय,मानकापूर नागपूर रा. भवाणी टावर्स,फ्लॅट क्रमांक २०४,गोमेवर नर्सिंग होम जवळ भंडारा असे सांगितले.

त्यानंतर सापळा पथक,दोन्ही पंच व मी व श्रीमती बांते असे लाच रक्कम ठेवलेले रूममध्ये गेलो असता खडर्यामध्ये (कागदी बॉक्समध्ये) मी ठेवलेली लाच रक्कम दिसून आली नाही म्हणून गै. अ. लोकसेवक श्रीमती बांते यांना पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी लाच रक्कमे बाबत विचारपूस करता त्यांनी सुरवातीला उडवा उडवीचे उत्तर दिले त्यानंतर विश्वासात घेवून विचारपूस करता लाच रक्कम सलवारचे(कुर्त्या) डावे खिश्यामध्ये एका कागदात ठेवले असले बाबत कळवून तो लाच रक्कम ठेवलेला कागद श्रीमती बांते यांनी स्वता काढूण पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांचे समक्ष हजर केले व पंच क्र २ यांचे मार्फतीने त्या लाचरक्कमेची पो.नि.पुरी यांनी तपासणी करून ती लाच रक्कम त्या कागदासह जप्त केली.त्यानंतर महीला पोलीस कर्मचारी यांचे मार्फतीने श्रीमती बांते यांच्या उजव्या

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

हाताची बोटे अल्ट्राव्हायोलेट लॅम्पच्या उजेडात न्याहाळली असता, हाताच्या बोटांच्या टोकावर अन्थ्रासिन पावडरची निळसर चमक [illegible] दोन्ही पंचासमक्ष दिसुन आली. यावाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजेश पुरी यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी गै.अ. लोकसेवक श्रीमती त्रिवेणी नत्थूजी बांते, वय ५५ वर्ष पद– क्रिडा अधिकारी,विभागीय क्रिडा संकुल कार्यालय,मानकापूर नागपूर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून आमचे संस्थेचा प्रथम प्रस्ताव मंजूर करुन व रक्कम संस्थेचे खात्यात जमा केली याचा मोबदला म्हणून मला [illegible]०००/- रु लाच रकमेची मागणी करून लाचरक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. तरी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये त्यांच्यावर योग्य कार्यवाही करण्यात यावी.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

[illegible] सहारे
पोलीस उप निरीक्षक
पो. स्टे. ~~[illegible]~~ नागपूर शहर
मानकापूर